महाराष्ट्र शासन

# सार्वजनिक आरोग्य विभाग

## जिल्हा स्तरीय निवड समिती,द्वारा जिल्हा रुग्णालय,सिंधुदुर्ग-सिंधुदुर्गनगरी

## दु.क्र .२३६२-२२८९०२/२२८६५४

क्र/जिरुसिं/आस्था/वैअ/नियुक्ती/[illegible] /२०२३ दि. १३/०२/२०२३

### WALK IN INTERVIEW - जाहिरात

सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा शल्य चिकित्सक सिंधुदुर्ग यांच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांमधील मंजूर असलेल्या वैद्यकीय अधिकारी गट-अ रिक्त पदांवर विहित केलेल्या अर्हताधारक उमेदवारांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.त्याकरिता पात्र व ईच्छुक उमेदवारांकडुन अर्ज मागविणेत येत आहेत.जाहिरातीच्या सविस्तर माहितीकरीता उमेदवारांनी https://arogya.maharahtra.gov.in या संकेतस्थळावर करीयर या मध्ये भेट द्यावी.

| पदनाम | शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा,वेतन | रुग्णालयातील वै.अ रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी गट अ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस.किंवा ॲलोपॅथिक विषयातील पदव्युत्तर पदवी/पदविका परिक्षा उत्तीर्ण. पदवी/पदविका प्रमाणपत्र प्राप्त असणे आवश्यक आहे.महाराष्ट्र मेडिकल कौन्सील मुंबई येथे नावाची नोंदणी होऊन नोंदणी प्रमाणपत्र वैध कालावधी असलेले आवश्यक आहे.<br>• अर्जाचे दिनांकास उमेदवाराचे वय ५८ वर्षे पेक्षा अधिक नसावे.<br>• एम.बी.बी.एस.अर्हताधारकांसाठी मासिक एकत्रित मानधन रु. ७५,०००/-<br>• पदव्युत्तर पदवी/पदविका विशेषतज्ञ अर्हताधारकांसाठी मासिक एकत्रित मानधन रु.८५,०००/- | ५६ |

**सूचना -**

१) उमेदवारांनी त्यांचे अर्ज विहीत नमुन्यात ए ४ साईज कागदावर संगणकावर तयार करुन दिलेल्या क्रमाने शैक्षणीक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रती त्या सोबत जोडाव्यात.

२) उमेदवारांनी मुलाखतीसाठी स्वखर्चाने दिलेल्या दिनांकास व वेळेत उपस्थित रहावे लागेल.सोबत शैक्षणीक अर्हतेची सर्व मुळ कागदपत्रे व त्यांच्या २ झेरॉक्स व साक्षांकित केलेल्या प्रती,आधारकार्ड,२ पासपोर्ट साईझ रंगीत फोटो हे सोबत आणावे.

३) मुलाखतीचा दिनांक,वेळ व ठिकाण - दि.२२/०२/२०२३ सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० पर्यंत जिल्हा रुग्णालय,सिंधुदुर्ग मु.सिंधुदुर्गनगरी (ओरोस) ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग पिन कोड ४१६८१२

CIVIL SURGEON SINDHUDURG

(डॉ.बी.एस.नागरगोजे)
जिल्हा शल्य चिकित्सक,सिंधुदुर्ग
व सदस्य सचिव जिल्हा निवड समिती

## अटी व शर्ती -

१) सदर नियुक्ती कंत्राटी पध्दतीने केवळ ११ महिन्यांसाठी किंवा सदर पदावर नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत किंवा बंधपत्रीत उपलब्ध होईपर्यंत यापैकी जी अगोदर घडेल तोपर्यंत अंमलात राहिल. त्यानंतर सदर नियुक्त्या आपोआप संपुष्टात येतील.

२) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना जाहिरातीत नमूद केल्यानुसार एकत्रित मानधन अनुज्ञेय राहिल.

३) सदर केवळ कंत्राटी स्वरुपात नेमणूका दिलेल्या तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

४) सदर तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ कंत्राटी स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकीय अधिका-यासारखे वेतन, रजा, विमा योजना, अंशदायी पेन्शन योजना अथवा तत्सम कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.

५) सदर तदर्थ नियुक्ती केवळ कंत्राटी स्वरुपात असल्याने त्यांना सदर पदावर कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

६) सदर तदर्थ कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना मनासे (वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतूदी लागू राहतील.

७) सदर तदर्थ वैद्यकीय अधिका-यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.

८) निवड झालेल्या तदर्थ वैद्यकीय अधिका-यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. तसेच बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.

९) तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने सदर पदावर कायम करणेबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही तसेच या सेवा कंत्राटी स्वरुपाच्या असल्याने त्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यांसाठी आंदोलन, संप/बंद इ.करणार नाही व त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र रु.१००/- चे स्टॅपपेपरवर घेण्यात येईल.

१०) कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची सेवा समाधानकारक नसल्यास/विनापरवानगी गैरहजर असल्यास/ कामामध्ये निष्काळजीपणा आढळल्यास आपली सेवा कोणतही कारण न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

११) वयोमर्यादा जाहिरातीत नमूद केल्यानुसार राहिल,त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या शिथिलता करण्यात येणार नाही.

१२) उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक अर्हतेबाबतच्या सर्व छायांकित प्रती व पासपोर्ट साईज फोटो मुलाखतीच्यावेळी सादर करण्यात यावा.

१३) शासनाने कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्ती नियुक्त केलेल्या उमेदवारास बंधनकारक राहतील वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त नियुक्ती प्राधिकारी आवश्यकतेनुसार अटी व शर्ती विहित करतील व त्या नियुक्त केलेल्या उमेदवारांस बंधनकारक राहतील.

१४) सदरील सेवा कालावधी बंधमुक्त प्रमाणपत्रासाठी ग्राहय धरण्यात येईल.

१५) जर एम.बी.ए.एस वैद्यकीय अधिकारी उमेदवार प्राप्त झाल्यास गुणवत्तेनुसारयांना कार्यमुक्त करण्यात येईल तथापी ते जिल्हा स्तरावरील प्रतिक्षा यादीमध्ये राहतील.

- **सोबत कंत्राटी नियुक्ती करीता अर्जाचा नमुना**

(डॉ.बी.एस.नागरगोजे)
सदस्य सचिव तथा
जिल्हा शल्य चिकित्सक सिंधुदुर्ग

CIVIL SURGEON SINDHUDURG

5 MMHS MO ADVT 2018 SINDHUDURG

नियुक्तीसाठी अर्जाचा नमुना

पास पोर्ट फोटो येथे चिकटवावा

प्रति,

मा.जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग

व अध्यक्ष जिल्हा निवड समिती

(द्वारा जिल्हा रुग्णालय,सिंधुदुर्गनगरी ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग पिन कोड ४१६८१२

विषय -कंत्राटी पध्दतीने वैद्यकिय अधिकारी या पदावर नियुक्ती मिळणेसाठीचा अर्ज सादर......

(एम.बी.बी.एस.वैद्यकिय अधिकारी गट -अ)

(पदव्युत्तर/पदविकाधारक- .......विशेषतज्ञ)

(वैद्यकिय अधिकारी बी.ए.एम.एस)

संदर्भ - जाहिरात क्र १६४२/२०२३ दि.१३/२/२०२३

महोदय,

मी वरील विषयात नमुद केलेल्या पदासाठी अर्ज सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे संपुर्ण नांव (आडनाव शेवटी) | |
| २ | जन्मतारीख व अर्जाचे दिनांकास वय | |
| ३ | धर्म,पोटजात | धर्म पोटजात |
| ४ | राहण्याचा पत्ता | मु.पो. भागाचे नांव<br>घर क्रमांक ता. जि. |
| ५ | संपर्क क्रमांक (इंग्रजी आकडयात) | एसटीडी कोड व दु.क्र<br>मोबाईल क्रमांक |
| ६ | ई मेल पत्ता | |
| ७ | शैक्षणीक अर्हता- पदवीधारक अर्हतेसमोर बरोबर खुणा करावी. | १)एम.बी.बी.एस.<br>२)पदवी परिक्षा उत्तीर्ण झालेचा महीना व वर्ष-<br>महाविद्यालयाचे नांव -<br>अंतिम वर्षाचे मिळालेले एकुण गुण-<br>श्रेणी - गुणांची टक्केवारी - |
| ८ | पदव्युत्तर/पदविका शैक्षणीक अर्हता | १)पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे नांव-<br>२) पदविका अभ्यासक्रमाचे नांव -<br>उत्तीर्ण महीना व वर्ष-<br>अंतिम वर्षाचे मिळालेले एकुण गुण-<br>श्रेणी - गुणांची टक्केवारी - |

| | | |
|---|---|---|
| ९ | एमएच सीआयटी परिक्षा किंवा<br>तत्सम संगणक ज्ञान परिक्षा | उत्तीर्ण महीना व वर्ष-<br>श्रेणी - गुणांची टक्केवारी - |
| १० | अनुभव<br>(वेगवेगळया संस्थेत असलेस या<br>क्रमाने माहिती देणेत यावी. | पदाचे नांव -<br>संस्थेचे नांव-<br>कालावधी -<br>एकुण अनुभव कालावधी - |
| ११ | सध्याचा व्यवसाय | खाजगी वैद्यकिय व्यवसाय- होय/नाही<br>खाजगी रुग्णालयात सेवा-<br>व्यवसाय/नोकरीचा पत्ता - |
| १२ | या पुर्वी केलेल्या शासकीय,निमशासकीय<br>सेवे बाबतची माहिती | संस्थेचे नांव-<br>कालावधी -<br>सेवा सोडणेच कारण - |
| १३ | वैवाहिक स्थिती | अविवाहीत/विवाहीत/घटस्पोटीत/विधवा<br>हयात अपत्यांची संख्या - |
| १४ | मेडिकल कौन्सिल मुंबई येथील नांव<br>नोंदणी | मूळ नोंदणी क्रमांक<br>अतिरिक्त अर्हता नोंदणी क्रमांक<br>नोदणी प्रमाणपत्र वैध कालावधी - |
| १५ | आधार कार्ड क्रमांक | इंग्रजी आकडयात |

**सोबत स्वसाक्षांकित कागदपत्रांच्या प्रती जोडलेल्या आहेत.**

१) जन्मतारीख प्रमाणपत्र/पुरावा २) वय व अधिवास प्रमाणपत्र ३) १० वी व १२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्र ४) शैक्षणिक अर्हतेच्या सर्व वर्षाच्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक व विद्यापिठ प्रमाणपत्र
५) पदव्युत्तर/पदविका अभ्यासक्रम अंतिम परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व विद्यापिठ प्रमाणपत्र
६)मेडिकल कौन्सिल मुंबई येथील नांव नोंदणी प्रमाणपत्र (वैधता दिसेल अशी प्रत) ७) एमएएचसीआयटी/संगणक ज्ञान परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र ८) अनुभव असलेस प्रमाणपत्र ९) आधारकार्ड १०) विवाहानंतर स्त्री उमेदवारांनी नांव बदलले असलेस राजपत्राची प्रत ११) लहान कुटंबाचे प्रतिज्ञापन

स्थळ-
दिनांक -

(डॉ. .....................)
उमेदवाराचे नांव व सही

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २०५५ मधील
प्रतिज्ञापनाचा नमुना -अ

प्र ति ज्ञा प न

नमुना -अ

(नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कुमारी ____________________

श्री. ____________________ यांचा/यांची मुलगा/

मुलगी/पत्नी वय ____ वर्षे राहणार ____________________

____________________ या द्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते कि,

(१) मी वैद्यकीय अधिकारी गट अ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ____ (संख्या) इतकी हयात मुले आहेत,त्या पैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या( )आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या,मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण -

दिनांक -

सही/-